**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : १६२२/२०२०**

**अपिलार्थी, श्री. अशोक श्रीराम गायकवाड,**
रा. वानखेडे ले आऊट, साईनगर, साईमंदिराच्या समोर, आनंदवनच्या बाजुला,
हुडको, पो. चिनोरा, ता. वरोरा जि.चंद्रपूर-४४२९१४.
-विरुध्द-

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
प.ह.नं. ३५, मौजा सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपूर.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्यालय, उमरेड ता. उमरेड जि. नागपूर.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०७.२०२२**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २२.०७.२०२० | ०३.०८.२०२० | २६.०८.२०२० | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २२.०७.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) मौजा सिर्सी प.ह.नं.३५, तह. उमरेड जि. नागपूर – गट क्र.४१५ शेतजमीनीवर (भ्रष्टाचार करुन लाखो रुपये संगनमताने) गट नं.४१५ तीन नावे चढविले ते त्वरीत कमी करण्यात यावी" इत्यादी एकूण ६ मुद्दयांची माहिती मागितलेली आहे. त्यावर ग्राम अधिकारी त.सा.क्र.३५ मौजा सिर्सी यांनी दिनांक ०३.०८.२०२० रोजी अपीलकर्ता यांना असे सूचीत केले की, मौजा –सिर्सी येथील भुमापन क्र.४१५ याचे बाबत मुद्दा क्र. १ ते ६ अन्वये सदर शेती ही रजिस्टर बक्षिस पत्रान्वये या मध्ये मालकी हक्क बदललेले आहे. मुद्दा क्र.१,३ व ४ ची माहिती तलाठी कार्यालयात उपलब्ध आहे व मुद्दा क्र.२,५ व ६ ही माहिती या कार्यालयाशी निगडीत नाही व प्रश्नार्थक आहे. त्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही. शासकीय सुट्टीचे दिवस सोडून आपण तलाठी कार्यालयातून मुद्दा क्र. १,३ व ४ ची माहिती रितसर शासकीय फी भरुन घेवून जावे. त्यानंतर अपीलार्थी यांनी **दिनांक २६.०८.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.१०.२०२० रोजी** "विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही, सुनावणी घेतली नाही" असे कारण नमुद करून व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १२.०७.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा तलाठी श्री.

व्ही. एस. बुधे उपस्थित आहेत तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी श्री. सि.पी. साटकर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपीलार्थी श्री. गायकवाड यांनी दिनांक २२.०७.२०२० रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३.०८.२०२० रोजी मुद्दा क्र.१,३ व ४ ची माहिती रितसर शासकीय शुल्क भरुन घेवून जावे, तसेच मुद्दा क्र. २,५ व ६ ची माहिती तलाठी कार्यालयाशी संबंधीत नाही, सदर माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही, असे अपीलाथीस पत्राद्वारे कळविले. अपीलार्थी यांनी दिनांक ०४.०७.२०२० रोजी मौजा सिर्सी प.ह.न. ३५ तहसिल उमरेड, जि. नागपूर गट नं. ४१५ या शेतजमीनीवर कायद्याची पायमल्ली करुन अनधिकृत सात बारावर चुकीचे नाव नोंदविले असल्यामुळे व ज्या व्यक्तींचे नाव चढविले आहे त्यांचेवर कार्यवाही करावी, असा तक्रारअर्ज दाखल केला आहे. त्यासंबंधात अपीलार्थी श्री. गायकवाड यांनी अधिक्षक केंद्रिय गुन्हे अन्वेषण, नागपूर यांचेकडे देखील सबंधीत प्रकरणाची चौकशी करणेबाबत तक्रार अर्ज केला होता. त्यावर अधिक्षक केंद्रिय गुन्हे अन्वेषण, नागपूर यांनी दिनांक ०९.०७.२०२० रोजी वरील प्रकरण जिल्हा पोलीस अधिक्षक, नागपूर यांच्या अखत्यारीत असल्याने हस्तांतरीत केले आहे. मूळ अर्जाच्या अनुषंगाने संकलीत केलेली माहिती प्रथम अपीलीय अधिकारी तहसिलदार उमरेड यांनी दिनांक १७.१२.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने पुरविण्यात आली. प्रथम अपीलात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संपूर्ण माहिती ३० दिवसात पुरविण्याचे निर्देशित दिलेले होते, असे आयोगासमोर कथन केले.

आज सुनावणी दरम्यान विदयमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०१.०१.२०२१ रोजी अपीलार्थी श्री. गायकवाड यांना नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविली असल्याचे नमुद केले आहे. अपीलार्थी यांनी माहिती प्राप्त करण्याकरीता दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याचे टपाल खात्याने नोंदविले व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात परत केले. त्यानंतर ८२ पृष्ठांची माहिती अपीलार्थी यांना प्रदान करण्यात आली असे कथन केले. अपीलार्थी यांची मूळ तक्रार ही वेळेत माहिती न मिळणे अशी असून त्यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ज्या कथीत मृत्युपत्राच्या अनुषंगाने फेरफार करण्यात आले आहे त्या बक्षीस पत्राची सत्यता पडताळणे याविषयीची असून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यांच्या संबंधीत असून त्यातील सक्षम प्राधीकरणावरील नियमांतर्गत असलेले महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी व दिवाणी न्यायालय अथवा तपास यंत्रणा असू शकते.

अपीलार्थी यांना सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या व माहिती अधिकाराच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर प्रतिसाद दिलेला असल्याने अपीलार्थी यांना तक्रारीच्या अनुषंगाने दिलेला प्रतिसाद योग्य दिलेला आढळून येतो. मात्र त्यांचा मूळ मुद्दा त्यांनी दिनांक ०४.०७.२०२० रोजी केलेल्या तक्रार अर्जावर करण्यात आलेली नेमकी कार्यवाहीचा १ संच नस्तीत टिपणीत झालेला पत्रव्यवहार यासह अपीलार्थी यांना वरील आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत प्रदान करावी, या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.०७.२०२२**

17 JAN 2023

जावक क्रमांक ---140--- दिनांक ---------------------

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर